नियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय
रॉयल इन्शुरन्स इमारत, ७वा मजला
जमशेटजी टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई-२०
शाखा ११
आवक क्रमांक १३२६
आवक दिनांक २०-१०-१५
प्रकरण क्रमांक ३००
अभिलेखाचे वर्गीकरण २०/१०/१५
26 OCT 2015
Circulate to all the concern immediately

## अधिसूचना

अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०००३२
दिनांक : १४ ऑक्टोबर, २०१५

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश,२०१५**

क्रमांक : संकीर्ण- १०१४/१३०६/प्र.क्र.१७६/नापु-१२ : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ ( सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५ ) च्या कलम ३(१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाद्वारे दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी निर्गमित केलेली अधिसूचिना याद्वारे रद्द करण्यात येत असून, उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिनस्त कार्यालयांमार्फत पात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपिल प्राधिकारी याबाबतच्या सुधारीत बाबी खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे नव्याने सेवा अधिसूचित करीत आहे :-

## परिशिष्ट

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिल अधिकारी | द्वितीय अपिल प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नवीन शिधापत्रिका मागणी | ३० दिवस | शिधावाटप अधिकारी / परिमंडळ अधिकारी / तहसिलदार/ अन्नधान्य वितरण अधिकारी | सहाय्यक नियंत्रक शिधावाटप / अन्नधान्य वितरण अधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी | उपनियंत्रक शिधावाटप / उप आयुक्त (पुरवठा) |
| २ | १.शिधापत्रिकेतील नावात दुरुती | ०३ कार्यालयीन दिवस | शिधावाटप अधिकारी / परिमंडळ अधिकारी / तहसिलदार/ अन्नधान्य वितरण अधिकारी | सहाय्यक नियंत्रक शिधावाटप / अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी | उपनियंत्रक शिधावाटप / उप आयुक्त (पुरवठा) |
| | २.शिधापत्रिकेत नावे समाविष्ट करणे / नाव वाढविणे | गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस अन्यथा ०३ कार्यालयीन दिवस | | | |
| | ३.शिधापत्रिकेमधील नाव कमी करणे | ०३ कार्यालयीन दिवस | | | |
| | ४.शिधापत्रिकेवरील पत्ता बदल करणे | ३० दिवस | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १.दुय्यम शिधापत्रिका (खराब / फाटलेली इ.) | गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस अन्यथा ०६ दिवस | शिधावाटप अधिकारी / परिमंडळ अधिकारी / तहसिलदार / अन्नधान्य वितरण अधिकारी | सहाय्यक नियंत्रक शिधावाटप / अन्नधान्य वितरण अधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी | उपनियंत्रक शिधावाटप / उप आयुक्त (पुरवठा) |
| | २. दुय्यम शिधापत्रिका (गहाळ शिधापत्रिका) | ३० दिवस | | | |
| ४ | नवीन रास्तभाव दुकानाची मंजुरी | जाहिरनामा काढल्यानंतर १८० दिवस | नियंत्रक शिधावाटप / अन्नधान्य वितरण अधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी | विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी | सचिव / विभागीय आयुक्त |
| ५ | रास्तभाव दुकानाच्या परवान्याचे नुतनीकरण | ६० दिवस | उपनियंत्रक शिधावाटप / अन्नधान्य वितरण अधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी | नियंत्रक शिधावाटप / जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ६ | किरकोळ रॉकेल विक्री परवाने | ९० दिवस | अन्नधान्य वितरण अधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ७ | किरकोळ रॉकेल विक्री परवान्याचे नुतनीकरण | ६० दिवस | अन्नधान्य वितरण अधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Deepak Shiv Kapoor

Digitally signed by Deepak Shiv Kapoor
DN: c=IN, o=ALL INDIA SERVICES, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Deepak Shiv Kapoor
Date: 2015.10.15 16:25:28 +05'30'

(दीपक कपूर)
शासनाचे सचिव